# वृत्त प्रसिध्दीसाठी

डीओपीटी पुरस्कृत सेंट्रल प्लॅन स्क्रीम अंतर्गत माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 या विषयावरील उत्कृष्ट उपक्रम (Best Practices) आणि यशोगाथा (Success Stories) यशदा मार्फत संकलित करण्यात येत आहेत. आपल्याकडील उत्कृष्ट उपक्रम आणि यशोगाथांची तपासणी करुन लोकहिताची पूर्तता करणारे उत्कृष्ट उपक्रम आणि यशोगाथांची निवड यशदामार्फत करण्यात येईल. अंतिम निवडी नंतर नमूद उत्कृष्ट उपक्रम आणि यशोगाथांचे सादरीकरण करण्यासाठी यशदामध्ये निमंत्रित करण्यात येईल. या विषयावरील एक दिवशीय कार्यशाळा दि.26 मार्च, 2019 रोजी आयोजित करण्याचे प्रस्तावित असून सार्वजनिक प्राधिकरणे, स्वयंसेवी संस्था, नागरीक यामध्ये सहभागी होऊ शकतात.

आपल्याकडील उत्कृष्ट उपक्रम आणि यशोगाथा 5,000 शब्दांच्या मर्यादेत सुवाच्छ अक्षरात हस्तलिखीत अथवा टंकलिखीत स्वरुपात जोडपत्र अथवा सर्व कागदपत्रांसह (अर्ज, अपिल, निर्णय, पत्रव्यवहार इ.) पाठविण्यात यावेत. उत्कृष्ट उपक्रम आणि यशोगाथांच्या सादरीकरणांस पारितोषिके देण्यात येणार असून प्रथम, द्वितीय, तृतीय असे क्रमांक काढून बक्षिस व प्रमाणपत्र देण्यात येतील.

तरी कृपया माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 या विषयावरील उत्कृष्ट उपक्रम आणि यशोगाथा दि.15 मार्च, 2019 पर्यंत Soft Copy आणि Hard Copy स्वरुपात यशदा कडे rti@yashada.org वर पाठवावेत.

**संचालक,**
माहिती अधिकार केंद्र,
यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा),
बाणेर रोड, पुणे-411 007.

## **उत्कृष्ट उपक्रम व यशोगाथा स्पर्धेसाठी प्रवेशिका नमुना**

प्रति,
**संचालक**,
माहिती अधिकार केंद्र
यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा),
राजभवन आवार, बाणेर रोड,
पुणे-411007

**उत्कृष्ट उपक्रम** (Best Practices) **व यशोगाथा** (Success Story) **या स्पर्धेसाठी** खालील प्रमाणे प्रवेशिका सादर करीत आहे.

| क्र. | माहितीचे मुद्दे | तपशिल |
|---|---|---|
| 1. | स्पर्धकाचे पूर्ण नाव (सार्वजनिक प्राधिकरणे, स्वयंसेवी संस्था, नागरीक) | |
| 2. | पूर्ण पत्ता | |
| 3. | संपर्क क्र. | |
| 4. | ईमेल | |
| 5. | उत्कृष्ट उपक्रम व यशोगाथा स्पर्धेसाठीचा विषय | |

(**स्पर्धकाचे नाव व स्वाक्षरी**)
(सार्वजनिक प्राधिकरणे, स्वयंसेवी संस्था, नागरीक)

स्थळ :
दिनांक :

सोबत जोडावयाचे पुरावे :1. ओळखपत्राची छायाकित प्रत
2. उत्कृष्ट उपक्रम (Best Practices) व यशोगाथा (Success Story) स्पर्धेसाठीचा मसुदा